दिनांक 28/12/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 211

विषय – विटा नगपरिषद क्षेत्रामध्ये होर्डींग, फ्लेक्स, बॅनर,पोस्टर इत्यादी लावणेसाठी जागा निश्चित करणे व त्यास व्यापक प्रसिध्दीबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी अतिक्रमण विभाग प्रमुख यांची दिनांक 27/12/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी

जनहित याचीका क्रं.155/2011 व नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. याचिका 3017/प्र.क्र.130/नवि-22 दि.14/11/2022 नुसार प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या क्षेत्रामध्ये होर्डींग, फ्लेक्स, बॅनर,पोस्टर इत्यादी तात्पुरत्या जाहीराती लावणेसाठी जागा निश्चित करणेचे व त्यास व्यापक प्रसिध्दी देण्याचे आदेश या शासन निर्णयावर देण्यात आले आहेत. प्रत्येक जाहीरात होर्डींग इत्यादीवर अर्जदाराचे नाव, परवानगी क्रमांक, परवानगी दिलेले ठिकाण, परवानगीचा कालावधी इत्यादी माहिती असणारा QR कोड लावणेचे आदेश नगरपरिषदांना दिलेले आहेत. त्यानुसार विटा नगरपरिषद हद्दीतील तात्पुरत्या जाहीराती लावणेसाठी जागा उपलब्ध आहेत. सदर उपलब्ध जागांची पोलिस ठाणे विटा व विटा नगरपरिषद यांचे मार्फत समक्ष पाहणी करून त्यामधून खालील जागा निश्चित करण्यात आलेल्या आहेत. सदर निश्चित केलेल्या जागांचे पोलिस विभागाकडून पत्र घेणेत आलेले आहे. सदर निश्चित केलेली जागा (ठिकाणे) खालील प्रमाणे.

| अ.क्र. | ठिकाणे | स्थळ | | बोर्ड संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 01 | मायणी रोड | 1 | ओढ्याजवळ | 01 | |
| | | 2 | श्रीराम नगर कॉर्नर समोर | 02 | |
| 02 | तासगाव रोड | 1 | आंबेडकर नगर कॉर्नर / निंबाळकर दुकान शेजारी | 01 | |
| | | 2 | 80 फूटी रोड | 01 | |
| | | 3 | गांधीनगर फाटा | 02 | |
| | | 4 | कदमवाडा चौक | 01 | |
| 03 | खानापूर रोड | 1 | सावरकर नगर कॉर्नर | 01 | |
| | | 2 | रेवा नगर शाळेसमोर | 02 | |
| | | 3 | घुमटमाळ चौकात | 01 | |
| 04 | कराड रोड | 1 | स्मशानभुमी जवळ | 01 | |
| | | 2 | एम.एस.ई.बी. कॉर्नर जवळ | 01 | |
| | | 3 | नवीन भाळवणी रोड कॉर्नर | 01 | |

पान नं.2 वर

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 05 | नेवरी रोड | 1 | शिवाजी नगर अकरा मारुती मंदीर जवळ | 01 | |
| | | 2 | जुना नेवरी नाका | 01 | |
| | | 3 | नेवरी रोड कॉर्नर | 02 | |
| 06 | कुंडल रोड | 1 | फुलेनगर कॉर्नर | 01 | |
| | | 2 | जोतिबा नगर | 01 | |
| | | 3 | सूर्यनगर कॉर्नर | 01 | |
| | | 4 | भवानीनगर | 01 | |
| 07 | साळशिंगे रोड / लेंगरे रोड | 1 | दत्तनगर पाण्याची टाकी समोर | 01 | |
| | | 2 | आय.टी.आय. समोर | 02 | |
| | | 3 | सिद्धिविनायक कॉलनी | 01 | |

तरी विटा नगपरिषद क्षेत्रामध्ये होर्डीग, फ्लेक्स, बॅनर,पोस्टर इत्यादी लावणेसाठी जागा निश्चितीस व त्यास व्यापक प्रसिध्दी देणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 28/12/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 212

विषय – नगरपरिषद हद्दीतील लोकशाहीर आण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत व महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजना (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत विविध विकास कामे करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा.मुख्याधिकारी यांनी नगर अभियंता यांची दिनांक 28/12/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी

2) मा. जिल्हा सहआयुक्त नगरप्रशासन शाखा जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांचेकडील सन 2023-2024 करिता लोकशाहीर आण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत मंजूर नियतव्यय पत्र क्र.नवि/कार्या-2/कावि-211/2023 दि. 17/05/2023

3) मा. जिल्हा सहआयुक्त नगरप्रशासन शाखा जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांचेकडील सन 2023-2024 करिता महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत मंजूर नियतव्यय पत्र क्र. नवि/कार्या- 4/कावि-164/2023 दि. 17/05/2023

4) मा. गोपीचंद पडळकर आमदार महाराष्ट्र विधानपरिषद यांचेकडील जावक क्र. 714/2023 दि.21/11/2023 रोजीचे पत्र.

5) मा. जिल्हा सहआयुक्त नगरप्रशासन शाखा जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांचेकडील पत्र क्र.नवि/कार्या-2/कावि-468/2023 दि. 07/12/2023

संदर्भ क्र. 2 व 3 अन्वये विटा नगरपरिषद हद्दीतील लोकशाहीर आण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत व महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत मंजूर निधीतून प्रस्ताव पाठविणेबाबत कळविले आहे. संदर्भ क्र. 4 अन्वये मा. गोपीचंद पडळकरसो, आमदार महाराष्ट्र विधानपरिषद यांचेकडील पत्रानुसार सदर योजनेअंतर्गत कामे सुचविणेत आलेली आहेत. तसेच संदर्भ क्र. 5 नुसार मा. जिल्हा सह आयुक्त नगरप्रशासन शाखा जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली यांनी दि. 07/12/2023 रोजीचे पत्रान्वये प्रस्ताव सादर करणेबाबत सुचित केले आहे.
तरी सदर प्रस्ताव सादर करणेकरीता सुचवलेली कामे ही खालीलप्रमाणे.

1) लोकशाहीर आण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना

1. विटा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र. 11 डॉ. बाबासाहेब आंबेडकरनगर येथे विविध ठिकाणी रस्ते ट्रिमिक्स कॉंक्रिटीकरण करणे व आर.सी.सी. गटर करणे.
2. विटा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र. 11 डॉ. बाबासाहेब आंबेडकरनगर अंतर्गत आर.सी.सी.गटर करणे. (अंदाजपत्रकीय र.रु. 25,08,273/-)
3. विटा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र. 09 फुलेनगर येथे अंतर्गत बोळे कॉंक्रिटीकरण व आर.सी.सी. गटर करणे. (अंदाजपत्रकीय र.रु.34,94,674/-)

पान नं.2 वर

4. विटा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र. 11 मायाक्कानगर येथे अंतर्गत रस्ते कॉंक्रिटीकरण व आर.सी.सी. गटर करणे. (अंदाजपत्रकीय र.रु. 22,20,918/-)
5. विटा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र. 11 मायाक्कानगर 80 फुटी बायपास रस्ता ते कांतीलाल कांबळे घर आर.सी.सी. गटर करणे.(अंदाजपत्रकीय र.रु.25,51,198/-)

2) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना

1. विटा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र. 08 नेवरी रोड शाहूनगर येथे विनायक शितोळे गाळयापासून आतमध्ये 80 मीटर आर.सी.सी. गटर करणे. (अंदाजपत्रकीय र.रु.15,50,320/-)
2. विटा नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क्र. 04 वलेकर हॉस्पीटल शेजारी गणेश कदम याचे रो हॉऊससमोर 80 मीटर आर.सी.सी. गटर करणे. (अंदाजपत्रकीय र.रु. 13,34,956/-)

उपरोक्त 1) लोकशाहीर आण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत काम क्र. 1 यांस प्रशासकीय ठराव क्र.54 दि. 25/07/2023 अन्वये मंजूरी देणेत आली आहे. तरी नगरपरिषद हद्दीतील लोकशाहीर आण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत व महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजना (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत वरील सर्व कामांना मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा